|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २३ (        ) जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर हिंदी भाषने रोजगारांची क्षमता सिध्द केली असल्याचे प्रतिपादन डॉ.शीतला प्रसाद दुबे यांनी व्यक्त केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळेतील हिंदी विभागाच्या वतीने मुद्रित शोधन या विषयावर आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ.दुबे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, तांत्रिक साधनांमुळे हिंदी मुद्रित शोधनाचे सिध्दांतिक ज्ञान प्राप्त करणे सहज सोपे झाले आहे. हिंदी वृत्तपत्रे, मासिके यांची कार्यालये, सरकारी कार्यालयांमध्ये मुद्रित शोधकांची अनेक पदे रिक्त आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी आपली भाषिक क्षमता वाढवली पाहिजे. उद्घाटन समारंभानंतर प्रथम सत्रामध्ये डॉ.उमाशंकर उपाध्याय यांनी देवनागरी लिपी व हिंदी वर्तनी का मानकीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथील मेघा आचार्य यांनी मुद्रित शोधन सिध्दांत एवं प्रविधी या विषयावर सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली द्वारे प्रमाणित हिंदी नामक वर्तनीचे ऑनलाईन मुद्रित शोधनामध्ये रोजगाराच्या संधी व शुध्द हिंदी कैसी लिखे या विषयावरील पीपीटी दाखवण्यात आले.

कार्यशाळेचा समारोप डॉ.तेजपाल चौधरी, सुप्रसिध्द भाषातज्ज्ञ, जळगाव यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, कार्यशाळेचा अहवाल केंद्रीय हिंदी संचालनालयाला पाठवला जावा जेणेकरुन मुद्रित शोधना संबंधी काही नवीन नियम बनवण्यास मदत होईल. कार्यशाळेत १०० विद्यार्थ्यांना आपला सहभाग नोंदवला. उद्घाटन सत्राचे संचलन डॉ.प्रिती सोनी व समारोपाचे सुत्रसंचालन प्रा.विजय लोहार यांनी केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी भाषा अभ्यास प्रशाळेतील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. २३ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी